# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००४.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५७०५१३१ ते ३३ फॅक्स -०२०-२५६६५८०७


(6)

क्र.रा.मं./लेखा/बीओआय/**परीक्षा शुल्क**/२०१९/३१८७

दिनांक : १५/०६/२०१९.

प्रति,

विभागीय सचिव,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

पुणे /कोल्हापूर/औरंगाबाद विभागीय मंडळे.

**विषय:-** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र **(इ.१० वी)** व **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) जुलै-ऑगस्ट, २०१९ ...**

परीक्षा शुल्क बँक ऑफ इंडिया मध्ये जमा करून घेण्यासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा ३/२९१४, दिनांक ३०/०५/२०१९.

२) या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा ३/३०७२, दिनांक १२/०६/२०१९.

महोदय,

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र **(इ.१० वी)** व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) जुलै-ऑगस्ट,२०१९ ची आवेदनपत्रे माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून **ऑनलाईन पध्दतीने भरण्याची कार्यवाही** सुरू झाली **असून सदर आवेदनपत्रांचे परीक्षा शुल्क संबंधित** शाळा व **कनिष्ठ महाविद्यालयांकडून चलनाव्दारे** बँक ऑफ इंडिया मध्ये **जमा करण्याबाबतच्या तारखाही आपणांस** संदर्भ क्र. १ व २ अन्वये **कळविण्यात आलेल्या आहेत.**

आपल्या विभागीय मंडळासाठी जुलै-ऑगस्ट,२०१९ परीक्षांचे परीक्षा शुल्क जमा करण्यासाठी बँक ऑफ इंडिया निवडण्यात आली असून सदर बँकेमध्ये आपल्या विभागीय मंडळाचे नांवे पुणे येथील शिवाजीनगर शाखेमध्ये जमा खाती (करंट अकाऊंट)उघडण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे आपल्या विभागीय मंडळ कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाईन सुधारित चलन प्राप्त होणार आहे. माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून करावयाची अपेक्षित कार्यवाही खालीलप्रमाणे असून ती आपल्या स्तरावरुन तातडीने सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. सदर शुल्क जमा करणेबाबतच्या सुधारित कार्यपध्दतीबाबत सर्व संबंधितांना वेळीच अवगत होईल याची दक्षता घ्यावी.

**आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व** माध्यमिक शाळा व **कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्याकडे विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्कापोटी जमा होणारी रक्कम शाळेच्या बँक खात्यामध्ये जमा करावी आणि ऑनलाईन चलन डाऊनलोड केल्यानंतर चलनावर नमूद असलेली रक्कम विहित मुदतीत त्यांच्या त्याच बँकेच्या खात्यामधून एनईएफटी/आरटीजीएस व्दारे चलनावरील नमूद बँक अकाऊंट नंबर** (Alpha Numeric) **व आयएफएससी कोड BKID000MSBP (**बीकेआयडी तीन वेळा शून्य एमएसबीपी **) प्रमाणे मंडळाकडे वर्ग करावयाची आहे.**

सदर चालू खात्यामध्ये जमा होणाऱ्या रकमांचा दैनंदिन अहवाल व एमआयएस (Daily Report & MIS) आपल्या विभागीय मंडळाच्या ईमेल वर प्राप्त होणार आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीचे प्रकटन सोबत जोडले असून आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रे व विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांतून त्वरित प्रसिध्दी देण्यात यावी.

**सचिव,**
**राज्य मंडळ, पुणे-०४.**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.४१६००४.

दुरध्वनी क्र.०२३१-२६९६१०१, ०२३१-२६९०८२९. ईमेल- divsec.kop@gmail.com

क्र.कोविम./ लेखा/ 709
दि. 18/06/2019

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

कोल्हापूर विभागीय मंडळातील सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना कळविण्यात येते की, राज्यमंडळाने क्र.रा.मं./लेखा/बीओआय/ परीक्षा शुल्क/2019/316 दि.15/06/2019 च्या पत्रान्वये परीक्षा शुल्क बँक ऑफ इंडिया मध्ये जमा करण्यासंदर्भात कळविल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

19/06

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

(2)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००४.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५७०५१३१ ते ३३ फॅक्स -०२०-२५६६५८०७

## -: जाहीर प्रकटन :-

पुणे / कोल्हापूर /औरंगाबाद विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) जुलै-ऑगस्ट, २०१९ करिता आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाइन पध्दतीने सादर केल्यानंतर आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे परीक्षा शुल्काचे बॅक ऑफ इंडियाचे चलन ऑनलाईन तयार होणार असून ते आपण डाऊनलोड करून घ्यावयायचे आहे. परीक्षा शुल्क बॅक ऑफ इंडिया मध्ये भरणा करण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्याकडे विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्कापोटी जमा होणारी रक्कम माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या बॅक खात्यामध्ये जमा करावी आणि ऑनलाईन चलन डाऊनलोड केल्यानंतर चलनावर नमूद असलेली रक्कम विहित मुदतीत त्यांच्या त्याच बॅकेच्या खात्यामधून NEFT/RTGS व्दारे चलनावरील नमूद बॅक अकाऊंट नंबर ( Alpha Numeric) व आयएफएससी कोड BKID000MSBP (बीकेआयडी तीन वेळा शून्य एमएसबीपी ) **प्रमाणे मंडळाकडे वर्ग करावयाची आहे.**

माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी एनईएफटी/आरटीजीएस केलेली रक्कम त्यांच्या खात्यातून वजा झाली आहे किंवा नाही तसेच अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.

तसेच, माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांचे शुल्क मंडळाकडे जमा झाल्याशिवाय त्यावरील पुढील प्रक्रिया होणार नाही याची दक्षता सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी घ्यावयाची आहे.

दिनांक १५/०६/२०१९.

सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.